तुमच्या भिंतीचा कान

# महाराष्ट्र दिनमान ठाणे

एक्सक्लुझिव्ह

गुरुवार, १३ जून, २०२४

वर्ष २४ • अंक : ७४ • रु. : २.०० • पाने : ०६ | ठाणे । मुंबई । पालघर । रायगड | epaper.mahadinman.com | @thanedinman | @thanedinman



## एसएसटी महाविद्यालयात योग प्रशिक्षण कार्यशाळा

कल्याण । २१ जून रोजी साजऱ्या केल्या जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या अनुषंगाने एसएसटी महाविद्यालयामध्ये एनएसएस सेल मुंबई विद्यापीठ, एनएसएस युनिट एसएसटी महाविद्यालय, आरोग्य योग आणि नॅचरोपॅथी सेंटर आणि जीवन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय योग प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली. या वेळी महिला सक्षमीकरण या विषयाला केंद्रस्थानी ठेवत ठाणे जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील एनएसएस स्वयंसेवकांना तज्ज्ञ मार्गदर्शकांनी योगाचे आयुष मंत्रालयाच्या निकषानुसार प्रशिक्षण दिले. हे प्रशिक्षित स्वयंसेवक त्यांच्या महाविद्यालयात जाऊन इतर विद्यार्थ्यांना योगाचे प्रशिक्षण देतील आणि आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या दिवशी प्रत्येक महाविद्यालयामध्ये योग दिवस साजरा केला जाईल. या वेळी आरोग्य योग आणि नॅचरोपॅथी संस्थेचे संस्थापक डॉ. विजय कुकरेजा यांनी विद्यार्थ्यांना योगाची विविध प्रात्यक्षिके करून दाखवत ती विद्यार्थ्यांकडून करून घेतली.